**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे**
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१**
दुरध्वनी क्र.२०-२६१२५६९६ फॅक्स नं.०२०-२६१२२२१७
ई-मेल आय.डी.क्र. Dydpune@gmail.com वेब साईट-www.dydepune.com

जा.क्र./प्रशि-५/व्यकोप्रमा/२०१५-१६/ 2992e दिनांक : 19 OCT 2015

प्रति,

प्राचार्य,
अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित
अध्यापक विद्यालय, पुणे विभाग.

विषय:डी.टी.एड प्रथम वर्ष २०१५-१६ बिगर अल्पसंख्यांक/अल्पसंख्यांक व्यवस्थापन कोटा प्रवेश मान्यतेबाबत.

संदर्भ: १.शासन निर्णय क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का-१, दि ०४/०७/२००८
२.मा.संचालक, म.रा.शै.सं.प्र.प.पुणे-३० यांचेकडील पत्र क्र.मराशैसंप्रप/शिशिप्रकक्ष-४(प्रवेश कक्ष)/१३३५/२०१५-१६, दिनांक २७.४.२०१५
३.या कार्यालयाचे पत्र क्र.१४४३४/३५, दिनांक २९.७.२०१५
४.या कार्यालयाचे पत्र क्र.१६१५९, दिनांक १९.८.२०१५
५.आपलेकडील पत्र क्र.३०३५, दिनांक १४.९.२०१५

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांकडून मान्य करुन घेण्यात यावे.' तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व्यवस्थापन कोटयातून झालेल्या प्रवेशास मान्यता घेण्यासाठी विहित नमुन्यात दि ३० जुलै २०१५ अखेर प्रस्ताव सादर करणेविषयी परिषदेने स्पष्ट आदेशीत केले आहे.

सदर सूचनेप्रमाणे दि ३० जुलै २०१५ पर्यंत ज्या अध्यापक विद्यालयांनी व्यवस्थापन कोटा प्रवेश मान्यतेचे परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेले आहेत. अशा प्रस्तावाबाबत दि २७ व २८ ऑगस्ट २०१५ रोजी एथेल गॉर्डन अध्यापिका विद्यालय, रास्ता पेठ, पुणे येथे शिबीर आयोजित केले होते.

मात्र ज्या अध्यापक विद्यालयांचे प्राचार्य/प्रतिनिधी सदर शिबीरास अनुपस्थित राहिले त्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली नाही.

तसेच दिनांक ३० जुलै २०१५ नंतर प्राप्त झालेल्या व्यवस्थापन कोटा प्रवेश प्रस्ताव मान्य/अमान्य करणेबाबत परिषदेकडील संदर्भिय पत्र क्र.५ नुसार आपले व्यवस्थापन कोटा प्रवेश प्रस्ताव अमान्य का? करण्यात येऊ नये याबाबत आपला सविस्तर खुलासा व हमीपत्र घेण्यात आले आहे.

त्यामुळे शिबीरास अनुपस्थित राहिले आणि दिनांक ३० जुलै २०१५ नंतर प्रस्ताव सादर केलेल्या तसेच ज्या अध्यापक विद्यालयांनी वरील प्रमाणे खुलासा व हमीपत्र सादर केली आहेत अशा अध्यापक विद्यालयातील प्राचार्य/प्रतिधिनी यांनी प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्राह खाली दिलेल्या दिनांकास समक्ष उपस्थित राहावे.

ज्या अध्यापक विद्यालयातील प्राचार्य/प्रतिनिधी उपस्थित राहाणार नाही, त्यांचे व्यवस्थापन कोटा प्रवेश मान्यता प्रस्ताव नामंजूर करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | पुणे/अहमदनगर/सोलापूर | २७ व २८, ऑक्टोबर २०१५ | एथेल गॉर्डन अध्यापिका विद्यालय, रास्ता पेठ, पुणे |

स्थळप्रतिवर मा.शिउसं यांची
स्वाक्षरी असे

(सुधाकर पाखरे)
शास्त्र सल्लागार
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर-
मा.संचालक, म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे-३०